शहर-जिल्हा ३ पुढारी
सातारा, मंगळवार
२६ जुलै २०१६

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव

# कोरेगावात रोडरोमिओंविरोधात मोहीम

## पोलिसांची १५ जणांवर कारवाई : विद्यार्थिनींमध्ये समाधान

**पळशी : वार्ताहर**

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालय परिसरात महाविद्यालयीन युवतींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओंविरोधात कोरेगाव पोलिसांनी धडक मोहीम उघडली. यावेळी पोलिसांनी १५ जणांवर कारवाई केली. या मोहिमेमुळे विद्यार्थिनींनी समाधान व्यक्त केले.



**कोरेगाव येथे कॉलेज परिसरात पोलिसांनी रोडरोमिओंविरोधात कारवाई केली.**

कोरेगाव-रहिमतपूर रोडवर डी. पी. कॉलेज परिसरात गेली अनेक वर्षे टवाळखोर युवक युवतींची राजरोस छेडछाड करत होते. या त्रासाने ग्रामीण भागातील अनेक युवतींनी शिक्षण अर्धवट सोडले. अखेर हुल्लडबाज युवकांचा बंदोबस्त करण्यासाठी डी. पी. भोसले कॉलेजचे प्राचार्य सावंत यांनी शहरातील मान्यवर, महिला प्रतिनिधींची, विविध संघटनांची, पालक वर्गाची एकत्रित बैठक घेतली. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कोरेगाव पोलिस ठाण्याला निवेदन देण्यात आले.

त्यानंतर पो. नि. संतोष पांढरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दि. २५ रोजी हुल्लडबाज युवकांच्या विरोधात मोहीम उघडत १५ जणांना ताब्यात घेतले. कारवाई केलेल्यांमध्ये जळगाव, आसरे, वडाचीवाडी, तडवळे, कोरेगाव, कुमठे, आझादपूर, खिरखिंडी, एकसळ परिसरातील युवकांचा समावेश आहे.

दरम्यान, प्राध्यापकांना शिवीगाळ करणाऱ्या जहीर मुल्ला, विशाल बर्गे यांच्यावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई सातारा येथील स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या मदतीने करण्यात आली. सिगारेट ओढत भरधाव गाडी चालवणे व प्राध्यापक व वॉचमन यांना शिवीगाळ केल्याप्रकरणी आदित्य ऊर्फ पप्या ओसवाल याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे

युवतींची छेडछाड करणाऱ्या टवाळखोरांवर यापुढेही धडक मोहीम राबवण्यात येणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

पुण्य नगरी 3
सातारा ▮ मंगळवार,२६ जुलै २०१६

# कोरेगावात रोडरोमिओंवर कारवाई

**कोरेगाव** / प्रतिनिधी

येथील डी. पी. भोसले महाविद्यालय परिसरामध्ये कोरेगाव-रहिमतपूर रस्त्यावर रोडरोमिओ करणाऱ्या दोघांवर सोमवारी प्रतिबंधात्मक कारवाई पोलिसांनी केली.

विशाल चंद्रकांत बर्गे (२२), जहीर चंद्रकांत बर्गे (२१, दोघे रा. चौथाई गल्ली, कोरेगाव) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या चार दिवसांपासून डी. पी. भोसले महाविद्यालय तसेच नवीन एस. टी. स्टँड परिसरात रोडरोमिओंचा धिंगाणा सुरू आहे. त्यामुळे पोलिसांनी रोडरोमिओंची दहशत मोडून काढण्याचा इरादा पक्का करून दोघांवर प्रतिबंधात्मक तर १६ जणांवर मुंबई पोलीस ॲक्टप्रमाणे कारवाई केली. तसेच मोटार वाहन कायद्याप्रमाणे ट्रिपलसीट, वीना परवाना वाहन चालविणे, प्रेशर हॉर्न, फॅन्सी नंबरप्लेट लावून गाडी चालविणे, वाहनांची कागदपत्र न बाळगणाऱ्या एकूण २५ जणांवर पोलिसांनी कारवाई करून ४५०० रुपये दंड केला आहे.

एकूणच कोरेगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक संतोष पांढरे यांनी रोडरोमिओ, टवाळखोरी करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा धडाका सुरू केल्याने त्यांच्या कार्याचे कोरेगाव शहरात कौतुक होत आहे.